NMC/ENV/OWL/2020/F-प.३५०

पर्यावरण विभाग
जा.क्र.मनपा/पर्या/कार्या-१/७०२/२०२०
दिनांक :१७/१२/२०२०

## नाशिक महानगरपालिका, नाशिक

मा.मुंबई उच्च न्यायालय येथे दाखल जनहित याचिका क्र.१७६/२०१२ मधील निर्देशानुसार तसेच मा. विभागीय आयुक्त, नाशिक यांचे पत्र क्र.कक्ष-१५/क.शु.-२/२०२/२०१९, दि.२०/०२/२०१९ अन्वये स्थापन केलेल्या नाशिक महानगरपालिका स्तरावरील उपसमितीच्या **दि.०४/१२/२०२०** रोजीच्या **तृतीय** बैठकीचे इतिवृत्त.

दिनांक ०४/१२/२०२० रोजी सकाळी ११.३० वाजता मा.आयुक्त सो. यांचे दालनात मा.उच्च न्यायालयात दाखल गोदावरी प्रदुषण जनहित याचिका क्र.१७६/२०१२ मधील मा.मुंबई उच्च न्यायालय यांनी आजपावेतो जे जे आदेश दिलेले आहेत, त्या मुद्यांचा व नव्याने दि.१८/१२/२०१८ रोजी दिलेल्या निर्देशा बाबतचा, तसेच निरीने दिलेल्या शिफारशींचा, तसेच गोदावरी प्रदुषण नियंत्रणाबाबत चर्चा करणेसाठी नाशिक मनपा स्तरावरील उपसमितीची तृतीय बैठक **शुक्रवार दि.०४/१२/२०२० रोजी सकाळी ११.३० वाजता Microsoft Teams वर Online** पध्दतीने खाली नमुद मान्यवरांच्या सहभागाने आयोजित केली होती.

१) आयुक्त, नाशिक महानगरपालिका
२) अतिरीक्त आयुक्त तथा अधिक्षक अभियंता, सा.आ.अ.वि.(मलनि)
३) अधिक्षक अभियंता (यांत्रिकी)
४) उपआयुक्त (गोसंक/पर्यावरण)
५) कार्यकारी अभियंता (पर्यावरण)
६) निरीचे प्रतिनिधी सौ. कोमल कलवापुडी
७) सहा.प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ
८) माहिती उपसंचालक, नाशिक यांचे प्रतिनिधी
९) जिल्हा सुचना विज्ञान अधिकारी यांचे प्रतिनिधी
१०) श्री.राजेश पंडीत, अशासकिय सदस्य (याचिका कर्ते)
११) श्री.निशिकांत पगारे, अशासकिय सदस्य (याचिका कर्ते)

सदर बैठकीतील मुददे व त्यावर केलेली /करावयाची कार्यवाही तथा निर्देश खालील प्रमाणे आहेत :-

| अ.क्र. | बैठकीतील मुददा | बैठकीत झालेली चर्चा, केलेली/ करावयाची कार्यवाही |
|---|---|---|
| १ | तक्रार नोंदविण्यासाठी टोल फ्री क्रमांक उपलब्ध करुन देणे बाबत | टोल फ्री क्रमांक<br>१) १८००२३३१९८२<br>२) ७०३०३००३००<br>सदर टोल फ्री नंबर उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत.<br>तसेच नाशिक महानगरपालिकेचे Online Grievance App "NMC e-connect" उपलब्ध असुन त्यामध्ये गोदावरी व तिच्या उपनदयांशी संबंधित तक्रारी नोंदविण्यासाठी सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. |

| | | |
|---|---|---|
| २ | निरीच्या शिफारशी, स्मार्ट सिटीच्या प्रोजेक्ट गोदा अंतर्गत १७ प्राचीन कुंड, नदी स्वच्छता बाबत | मा. आयुक्त सो. यांनी आदेशित केले की, नाशिक स्मार्ट सिटीला संदर उपसमितीमध्ये सदस्य करुन घ्यावे, तसेच प्राचार्या डॉ. प्राजक्ता बस्ते यांना निमंत्रित सदस्य म्हणून समावेश करावा. सदर उपसमितीने स्मार्ट सिटी अंतर्गत सुरु असलेल्या प्रोजेक्ट गोदा प्रकल्पाला संयुक्त भेट दयावी. तसेच गोदावरी नदी किनारी स्मार्ट सिटी मार्फत प्रोजेक्ट गोदा अंतर्गत सुरु असलेल्या आरसीसी रिटेनिंग वॉल बाबत निरीच्या शिफारशींनुसारच कार्यवाही करण्यात यावी असे उपसमिती मार्फत पत्र देणेत यावे. |
| ३ | अस्तित्वातील मलनिःसारण केंद्रांच्या आधुनिकीकरणाबाबत | मा.आयुक्त सो. यांनी S.T.P. चे Upgradation चे कामकाजाबाबत आढावा घेतला.<br>महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या नविन मानकांनुसार अस्तित्वातील तपोवन व आगरटाकळी मलनिःसारण केंद्रांचे आधुनिकीकरण करणेचा प्रस्ताव (D.P.R.) तयार करणेत आला असुन मा. राज्य शासनाच्या पर्यावरण विभागाकडे पाठविणेत आला आहे. तसेच उर्वरीत २ एसटीपी (चेहडी व पंचक) या २ मलनिःसारण केंद्रांचे डिपीआर तयार करणेचे काम सल्लागार मे. सेपियंट कन्स्ल्टंटस यांचे मार्फत सुरु आहे व २० डिसेंबर २०२० पर्यंत डिपीआर तयार करणेबाबत सल्लागार यांना निर्देश देणेत आले आहेत.<br>नागपुर येथिल ओझोन रिसर्च ॲण्ड ॲप्लिकेशन प्रा. लि. यांनी असा प्रस्ताव दिला आहे की, सद्यस्थितीत अस्तित्वात असलेल्या एसटीपी मधुन बाहेर पडणाऱ्या प्रक्रियायुक्त मलजलावर ओझोनेशनची प्रक्रिया करुन अतिरिक्त शुध्दीकरण करुन त्याव्दारे महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या नविन मानकांनुसार मलजल प्रक्रिया करण्यास तयार आहेत. तसेच त्यांनी त्यांचे प्रस्तावात ज्या नाल्यांमधुन सांडपाणी वाहते त्या नाल्यांवर देखिल ओझोनेशनव्दारे प्रक्रिया करणे व नाल्यात वाहणारे पाणी शुध्द करणे शक्य असलेबाबत नमुद केले आहे. मा. आयुक्त सो. यांनी निर्देश दिले की, सदर कंपनीस त्यांचे खर्चाने तपोवन मलशुध्दीकरण केंद्र व रामवाडी नाला येथे प्रायोगिक तत्वावर प्रात्यक्षिक देणे बाबत कळविण्यात यावे. |
| ४ | गोदावरी नदीसाठी पोलिस संरक्षण | मा.उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार गोदावरी नदी साठी पोलिस उपलब्धतेबाबत मा.मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार ३० पोलिस कॉस्टेबल व ४ पी.आय. यांची नेमणूक करणेबाबत आदेशित केले आहे. |

प. ३५६

| | | |
|---|---|---|
| ५ | एम.आय.डी. हददीमधील होणारे प्रदुषण | एम.आय.डी.सी. क्षेत्रातील नदी नाल्यांमध्ये प्रदुषण करणाऱ्या अस्थापनांवर एम.आय.डी.सी. व एम.पी.सी.बी. ने संयुक्तरित्या कार्यवाही करावी. |
| ६ | जल पुनर्भरण | श्री. राजेश पंडीत यांनी सुचिवले की, प्रथमतः मनपाच्या सर्व इमारतींसाठी पावसाळी जल पुनर्भरण करण्याची व्यवस्था करण्यात यावी. त्यावर मा.आयुक्त साहेब यांनी निर्देश दिले की, मनपाच्या मालकीच्या सर्व मिळकतींमध्ये जल पुर्नभरण करण्यात यावे. |
| ७ | प्लास्टिक बंदी | मा. आयुक्त सो. यांनी निर्देश दिले की, संचालक (घनकचरा व्यवस्थापन) यांनी प्रतिबंधित प्लास्टिक पिशव्यांचे कारखानदारांवर महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांच्याशी समन्वय साधुन संयुक्तपणे कार्यवाही करावी. |
| ८ | पावसाळया मधील वाघाडी नदीच्या ओव्हर फलो बाबत. | श्री. निशिकांत पगारे यांनी मुददा उपस्थित केला की, गेल्या पावसाळयात वाघाडी नदीमधील ओव्हर फलो च्या वेळेस संबंधित मेंटेनन्स कॉन्ट्रॅक्टर वर काय कारवाई केली. सदर मक्तेदारावर र.रु. ५०००/- इतक्या दंडाची आकारणी करण्यात आली आहे, व मक्तेदाराच्या देयकातुन वसुल करण्यात आले आहे. सदर ठिकाणी अनेक व्यक्तींचा वावर असतो व सदर ठिकाणचे गेट अनेक वेळेस अज्ञात व्यक्तींकडुन उघडण्याचे निदर्शनास आल्यामुळे पोलिस विभागास कळविण्यात आले आहे. या ठिकाणी ओव्हर फलो होऊ नये यासाठी कायम स्वरुपी उपाय योजना करण्याच्या दुष्टीकोनातुन सदर ठिकाणचे ओपन चॅनलचे काम सुरु करण्यात आले असुन त्यापैकी पाईलिंगचे व पाईल कॅपचे काम पुर्ण करण्यात आले आहे, व उर्वरित काम येत्या ३ महिन्यात पुर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. |

याप्रमाणे सदर बैठकीत चर्चा करणेत येऊन बैठक विसर्जीत करण्यात आली.

आयुक्त

नाशिक महानगरपालिका, नाशिक